# मा. दिवाणी न्यायाधीश साहेब, व.स्तर कोर्ट, गंगाखेड

दि.दा.नं. : ३१८/२०२५

Exh-43

वादी : अंगद

**विरुध्द**

प्रतिवादी : तहलिसदार व ईतर

ORDER
Read & recorded.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
YADAV GAJANAN
BHANUDAS
Date: 2025.08.28
15:30:36 +0530

CJSD, Gangakhed.

वाद : वाटणी

## प्रतिवादी नं. ४ ते १५ तर्फे खालीलप्रमाणे लेखी निवेदन सादर करण्यांत येत आहे.

१. असे की, वादपत्रातील कलम नं. १ मधील मजकुर प्रतिवादी नं. ४ ते १३ हे जोशी समाजातील गावातील लोक आहेत हे बरोबर आहे. मात्र त्यांनी वादीच्या शेतात स्मशानभुमीची जागा नसताना ७/१२ वर नोंद घ्यावी असा बेकायदेशीर अर्ज दिला हा मजकुर असत्य व खोटा आहे.

२. असे की, वादपत्रातील कलम नं. २ मधील मजकुर वादीचे वडील नामदेव पि. गणपती दनदने यांनी त्यांच्या हयाती मध्ये वादी यास वाटणी फेरफार क्र. ४६० आधारे शेत सर्व्हे नं./गट नं. २५५/१ क्षे. २ हे. ९३ आर पोटखराब १० आर पैकी ५२ आर पोटखराब ५ आर शेती वाटून दिली वगैरे मजकुर असत्य व खोटा आहे.

12-Bhe

Received

३. असे की, वादपत्रातील कलम नं. ३ मधील मजकुर वादीच्या गावामध्ये मागील ३ वर्षांपासुन गाव पातळीवरील राजकारणात ओबीसी विरुध्द ओपन या प्रवर्गात वाद चालु झालेला आहे, हा मजकुर असत्य व खोटा आहे. तसेच गावातील पोलीस पाटील हे शासकिय मानधनावर नौकरीस असताना विनाकारण गावपातळीवरील राजकारणातुन वादीवर आकस बुध्दीने व सुडभावनेने प्रतिवादी क्र. ४ ते १३ यांना फुस

लावुन वादी विरुध्द भडकवत आहेत. प्रतिवादी नं. १ ते ३ यांना चुकीची माहीती देत आहेत, प्रतिवादी क्र. १६ रामेश्वर चे व वादी यांच्या गटाचे ग्रामपंचायत राजकारणावरुन पुर्वीपासुन वाद आहे, प्रतिवादी १६ यांनी वादीचे नुकसान व्हावे म्हणुन प्रतिवादी क्र. ४ ते १५ मार्फत बेकायदेशीर मागणी केली आहे हा मजकुर असत्य व खोटा आहे.

४. असे की, वादपत्रातील कलम नं. ४ मधील मजकुर वादीच्या मालकी ताब्याचे शेत सर्व्हे नं./गट नं. २५५/१ क्षे. ५७ आर बाबत प्रतिवादी नं. ४ ते १३ या गावातील जोशी समाजाच्या लोकांनी प्रतिवादी नं. १ कडे खोटी माहीती नमुद केली, वादीच्या वडीलांनी १ गुंठा जागा दानपत्र करुन दिल्यामुळे लावण्यात यावी हा मजकुर असत्य व खोटा आहे.

५. असे की, वादपत्रातील कलम नं. ५ मधील मजकुर मंडळ अधिकारी यांनी मराठा समाजाच्या लोकांना पंचनाम्याच्या वेळी माहीती दिली नाही, पंचनाम्या वेळी त्या समाजातील लोक व त्या समाजातील पोलीस पाटील यांनी मनमानी केली हा मजकुर असत्य व खोटा आहे. तसेच प्रतिवादी क्र. ३ हे पंचनाम्यासाठी आल्यानंतर त्यांनी ग्रामपंचायत रेकॉर्ड तपासुन सांगणे अभिप्रेत होते, मंडळ अधिकारी यांनी पंचनाम्याच्या वेळी तक्रारदार प्रतिवादी क्र. ४ ते १३ यांना सांगीतले नाही, तक्रारीत चुकीचे कथन केले आहे वगैरे मजकुर असत्य व खोटा आहे. गायरान बाबत माहीती सांगणे गरजेचे होते, वादीचे प्रत्यक्ष बयान न घेता त्याच्या तोंडून न निघालेले वाक्य पंचनाम्यात नमुद केलेले आहेत वगैरे मजकुर असत्य व खोटा आहे.

६. असे की, वादपत्रातील कलम नं. ६ मधील मजकुर वादीच्या वडीलांनी कसल्याही प्रकारचा कुठलाही मोबदला न घेता दानपत्र करुन दिलेले नाही. सदर समाजातील लोक सुशिक्षीत असुन त्यांच्याकडे अंत्यविधी करण्यासाठी त्यांच्या समाजाच्या लोकांच्या नांवे शेत जमीनी आहेत, गावालगत गायरान जमीन आहे, स्मशानभुमीसाठी पर्यायी जागा आहे हा मजकुर असत्य व खोटा आहे. कायदा सुव्यवस्था

बिघडवण्यासाठी पोलीस पाटील रामेश्वर भोळे हे काम करत असल्याबद्यल प्रतिवादीकडे स्पष्ट मत मांडले वगैरे मजकुर असत्य व खोटा आहे.

७. असे की, वादपत्रातील कलम नं. ७ मधील मजकुर प्रतिवादी नं. १६ बळीराम एका गटाचा असुन स्वस्त धान्य दुकान चालवतो, दुकानामध्ये लाभधारकास धान्य मिळत नसल्याने वादी व ईतर लोकांनी तक्रारी केल्या तेंव्हापासुन तो वादीवर चिडलेला आहे हा व ईतर सर्व मजकुर असत्य व खोटा आहे.

८. असे की, वादपत्रातील कलम नं. ८ मधील मजकुर दि. ८.३.२०२५ रोजी प्रतिवादी क्र. ३ याने अचानकपणे वादीच्या शेताची पाहणी केली, वादीने वस्तुस्थिती तहसिलदार यांच्या समोर आणुन दिली, त्यावेळी प्रतिवादींनी वादी यास धमकी दिली, पोलीस पाटील व अन्य समाजातील लोक वादग्रस्त विधान करुन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करीत आहेत हा व ईतर मजकुर असत्य व खोटा आहे.

९. असे की, वादपत्रातील कलम नं. ९ मधील मजकुर प्रतिवादी क्र. ४ ते १३ यांनी निवेदनात दानपत्रा बाबत उल्लेख केलेला आहे ही बाब संपुर्णतः चुकीची व खोटी नमुद केलेली असुन वादीने दानपत्रा बाबत पाहणी केली, परंतु तशी नोंद वादीस दिसुन आली नाही वगैरे मजकुर असत्य व खोटा आहे.

१०. असे की, वादपत्रातील कलम नं. १० मधील मजकुर प्रतिवादी क्र. १६ हा वादीस ग्रामपंचायत राजकारणामुळे त्रास देत आहे, हा मजकुर असत्य व खोटा आहे.

११. असे की, वादपत्रातील कलम नं. ११ मधील मजकुर प्रतिवादी क्र. १ यांनी प्रकरणात सुनावणी घेतली नाही, तसेच वादीस अधिकचे पुरावे, लेखी युक्तिवाद द्यावयाचा असताना पुढील तारीख दिली, मात्र अचानकपणे निकाल पारीत करण्यात आला, प्रतिवादी नं. १ ने रजिष्टर तपासने गरजेचे होते, नमुना नं. ८ चे उतारे पाहणे आवश्यक होते, सन

२०११ पासुन जोशी समाजाच्या किती लोकांचा मृत्यु झाला, त्यासंबंधी मृत्युपत्र तपासणी करणे गरजेचे होते या बाबी प्रतिवादीने केलेल्या नसल्याने निकाल बेकायदेशीर आहे. प्रतिवादी क्र. १ ने चुकीचा संदर्भ लाऊन आदेश पारित केलेला आहे, आदेशात चुकीचा निष्कर्ष काढलेला आहे, निर्णय पुर्णत: राजकिय दबावापोटी प्रतिवादी क्र. १ यांनी पारित केलेला आहे, आदेशात चुकीचा संदर्भ दिलेला आहे, वादीचे वडील वादी व त्याच्या भावाच्या मदतीशिवाय कुठलाही निर्णय घेत नव्हते हा व ईतर सर्व मजकुर असत्य व खोटा आहे.

**१२.** असे की, वादपत्रातील कलम नं. १२ मधील मजकुर तहसिलदार यांनी पारित केलेल्या निर्णयाची माहीती वादीस दिली नाही, दि. ९.६.२०२५ रोजी वादीस माहीती झाली, आदेशामध्ये कुठल्याही चतु:सिमा नमुद केलेल्या नाहीत हा व ईतर सर्व मजकुर असत्य व खोटा आहे.

**१३.** असे की, वादपत्रातील कलम नं. १३ मधील मजकुर दि. ९.६.२०२५ रोजी प्रतिवादी क्र. ४ ते १७ यांनी वादीच्या मालकीच्या शेतात बळजबरी येण्याचा प्रयत्न केला, वादीस स्मनशानभुमी करणार अशी धमकी दिली वगैरे मजकुर असत्य व खोटा आहे. कलम नं. १४ ते १८ कायद्याचे असल्याने त्याविरुध्द भाष्य करण्याची आवश्यकता नाही.

K.Bhe

## अधिक निवेदन

**१४.** असे की, वादीचे संपुर्ण वादपत्र असत्य निवेदनावर आधारीत आहे, वादीस वादपत्र सादर करणे बाबत प्रतिवादी विरुद्ध कोणत्याही प्रकारचे कारण नाही, त्यामुळे वादीचे वादपत्र प्रतिवादी विरुद्ध खारीज करण्यात यावे.

**१५.** असे की, मौ. आनंदवाडी येथे जोशी समाज असुन जोशी समाज भटक्या जातीत येतो, जोशी समाजातील लोकांना

मृत्युनंतर अंत्यसंस्कारासाठी स्मशानभुमी नसल्यामुळे जोशी समाजाने नामदेव गणपती दनदने यांना ४००००/- रु. देवुन एक गुंठा जागा त्यांच्याकडून घेतली. समाज अशिक्षीत असल्यामुळे स्मशानभुमीसाठी एकाचे नांवाने खरेदीखत करता येत नाही, त्यामुळे शेत सर्व्हे नं. २५५ मध्ये नामदेव गणपती दनदने यांचे क्षे. ५१ आर होते, त्यापैकी क्षे. १ गुंठा जागा नामदेव गणपती दनदने यांच्याकडून जोशी समाजाने जोशी समाजाला स्मशानभुमीसाठी सन २०११ साली दानपत्रा आधारे घेतली आहे, नामदेव गणपती दनदने यांनी १००/- रु. च्या स्टॅम्प पेपरवर सदर जागेबाबत दानपत्र करुन दिलेले आहे. व सदरील जागेवर मागील १३ वर्षांपासुन जोशी समाजाच्या मयत झालेल्या लोकांचा अंत्यसंस्कार करण्यात येत आहे.

**१६.** असे की, नामदेव गणपती दनदने हे अंदाजे सन २०१६ ला मयत झाले, शेती वादीचे नांवाने झाली होती. जोशी समाजात स्मशानभुमीच्या जागेत पावसाळयामध्ये अंत्यविधीच्या वेळेस प्रेताची विटंबना होत होती, त्यामुळे शेड करावयाचे होते, त्यावेळेस वादीने शेड करण्याच्या कामात अडथळा केला. त्यामुळे प्रतिवादी यांनी तहसिलदार गंगाखेड यांच्याकडे स्मशानभुमीची एक गुंठा जागा ७/१२ ला लावुन देणे बाबत दि. ६.१.२०२५ रोजी अर्ज सादर केला. तहसिलदार गंगाखेड यांनी दि. ६.१.२०२५ रोजी प्रकरण सुरु केले ज्यामध्ये मधुकर राजाराम भोसले हा अर्जदार होता, सुग्रीव नामदेव दनदने व अंगद नामदेव दनदने हे गैरअर्जदार होते. मंडळ अधिकारी यांनी दि. २७.१.२०२५ रोजी स्थळ पाहणी करुन पंचनामा केला, तत्पुर्वी अर्जदार, गैरअर्जदार व संबंधीतांना नोटीस बजावण्यात आल्या. पंचनाम्या मध्ये सदर १ आर जागा स्मशानभुमीसाठी देण्यात आली आहे, जोशी समाज व व्होलेर समाजाची मयत माणसांचेप्रेत संस्कार याठिकाणी दहन केले आहेत, स्मशानभुमीची आवश्यकता आहे असे पंचनाम्या मध्ये नमुद करण्यात आले. व मंडळ अधिकारी यांनी अहवाल सादर केला. तहसिलदार गंगाखेड यांनी मंडळ अधिकारी यांचे स्थळ पाहणी व प्रत्यक्ष परिस्थिती क्षे. १ गुंठया बाबत झालेले दानपत्र याबाबत पुर्ण चौकशी करुन दि. २.६.२०२५ रोजी आदेश केला व आदेशामध्ये मौ. आनंदवाडी येथील गट क्र. २५५/१ मधील १ आर जमीनीची नोंद ईतर अधिकारा मध्ये ७/१२ मध्ये घेण्याची कार्यवाही करावी, गैरअर्जदार यांनी जोशी समाजासाठी

दानपत्रा आधारे दिलेल्या जमीनीवरील अतिक्रमण काढून घ्यावे, अंत्यसंस्कार करण्यासाठी कुठलीही अडीहरकत गैरअर्जदार यांनी करु नये असे आदेशात नमुद केले. त्या आधारे प्रतिवादी क्षे. १ गुंठयाचा स्मशानभुमी साठी वापर करत आहेत.

१७. असे की, वादी जोशी समाजाला स्मशानभुमीचे शेड करण्यासाठी अडथळा करत असताना सरपंच, पोलीस पाटील महातपुरी व आनंदवाडी, तंटामुक्ती अध्यक्ष प्रभाकर चाफळे, वादी, वादीचा भाऊ गावातील सर्व समाजाचे नागरिक हजर होते, चर्चा झाली. त्यामध्ये वादी सर्वासमोर म्हणाला सुग्रीवने जागा दिली, त्याने पैसे घेतले, त्याच्या शेतातील जागा घ्या, माझ्या शेतातील घेऊ नका. त्यावर सुग्रीव म्हणाला एकत्र असताना सर्वांनी पैसे खर्च केले आहेत, वादी व वादीचा भाऊ हे आपसात स्मशानभुमीसाठी दिलेल्या १ गुंठयाबाबत वाद करत होते. त्यामुळे प्रतिवादींना तहसिलदार यांच्याकडे संपर्क करावा लागला.

१८. असे की, वादीने वादपत्रात नमुद केल्याप्रमाणे मराठा ओबीसी असा कोणत्याही प्रकारचा वाद नाही. जोशी समाजाला १ गुंठा जागा दानपत्रा आधारे स्मशानभुमीसाठी देण्यात आली या चौकशी मध्ये मराठा समाजाचे लोकांनीही साक्ष नोंदवलेली आहे.

१९. असे की, तहसिलदार गंगाखेड यांनी दिलेला आदेश बरोबर आहे, परिपुर्ण आहे, आदेश देण्यापुर्वी तलाठी, मंडळ अधिकारी यांनी चौकशी केली, स्थळपाहणी केली, पंचनामा केला, सरपंच, ग्रामसेवक यांच्याकडे दानपत्रा बाबत म्हणने मागवले, तहसिलदार बी.डी.ओ. यांनीही पाहणी केली व त्यानंतरच वस्तुस्थितीवर आधारीत निकाल, आदेश केला आहे व त्याआधारे स्मशानभुमी बाबत ७/१२ मध्ये कायदेशीर नोंद झालेली आहे.

K. Bue

२०. असे की, वादीने प्रतिवादी विरुध्द खोटे वादपत्र सादर केले आहे, वादपत्रातील वादमध्ये वादीच्या ५७ आर मध्ये अडीहरकती करु नये, तसेच स्मशाभुमी बाबत अंमलबजावणी करु नये

अशी मागणी केली आहे. मुळात प्रतिवादी वादीच्या ताब्यामध्ये कधीही अडीहरकती करत नाहीत, प्रतिवादींना जोशी समाजाच्या स्मशानभुमी साठी जी १ गुंठा जागा मिळाली आहे त्या जागेबाबतच प्रतिवादींना हक्क व अधिकार आहेत. प्रतिवादी आपल्या मयत लोकांच्या अंत्यसंस्कार सदर १ गुंठा क्षेत्रफळातील स्मशानभुमी मध्ये करतात.

२१. असे की, वादीने वादपत्रा मध्ये प्रतिवादी यांनी दिलेला दि. २.६.२०२५ रोजीचा आदेश, निकाल रद्यबातल करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे. सदरील तहसिलदार यांच्या निकालाविरुध्द वादीला उपजिल्हाधिकारी गंगाखेड यांच्याकडे अपिल दाखल करण्याची तरतुद होती. या न्यायालयास अधिकारक्षेत्र नसल्यामुळे वादीचे वादपत्र प्रतिवादी विरुध्द खारीज करण्यात यावे.

२२. असे की, वादीने वादपत्रात तात्पुरता मनाई आदेश मिळणेस्तव अर्ज सादर केला आहे, त्यावर मा. न्यायालयाने प्रतिवादींनी स्मशानभुमीच्या क्षे. १ गुंठा मध्ये कोणतेही बांधकाम करु नये व वादीने मयताचे अंत्यसंस्कारा मध्ये अडथळा करु नये असा आदेश केला आहे, परंतु वादीने स्मशानभुमीसाठी दिलेल्या जागेमध्ये उसाची लागन केली आहे व प्रतिवादींना अंत्यसंस्काराचा विधी करणेस अडचण निर्माण केलेली आहे. वादी मा. न्यायालयात स्वच्छ हाताने आलेला नाही, वादीचे वर्तन माणुसकी विरुध्द आहे, वादीची केस प्रथमदर्शनी सिध्द नाही, स्मशानभुमी साठी १ गुंठा जागा दिल्याबाबत दानपत्राचा कागदोपत्री पुरावा आहे, तहसिलदार यांचा निकाल आहे. या सर्व परिस्थितीत वादीचे वादपत्र व तात्पुरता मनाई आदेश अर्ज प्रतिवादी विरुध्द खारीज करण्यात यावा.

## <u>विनंती की,</u>

**प्रतिवादी नं. ४ ते १५ यांचे लेखी निवेदन स्विकारुन वादीचे वादपत्र प्रतिवादी विरुद्ध खर्चासह खारीज करण्यात यावे.**

**दिनांक : /८/२०२५**

प्रतिवादी नं.४ ते १५

४. मधुकर राजाराम भोसले

५. साळबा नवनाथ सरवदे

६. वसंत बापुराव भोळे

७. सदाशिव अंबाजी भोसले

८. केशव सत्तु भोळे

९. अनंत बापुराव भोळे

१०. आकाश सदाशिव भोसले

११. सुरेखा रामेश्वर भोळे

१२. नवनाथ संतोबा सरवदे

१३. अशोक राजाराम भोसले

१४. संजय बापुराव भोळे

१५. सुधाकर अंबाजी भोसले

## तसदिक

मी प्रतिवादी नं. ४ ते १५ शपथपुर्वक निवेदन करतोत की, वरील लेखी निवेदनातील संपुर्ण मजकुर हा खरा व बरोबर आहे करीता आज रोजी शपथेवर तसदिक करण्यात आली.

दिनांक : /८/२०२५

प्रतिवादी नं.४ ते १५

४. मधुकर राजाराम भोसले

५. साळबा नवनाथ सरवदे

६. वसंत बापुराव भोळे

७. सदाशिव अंबाजी भोसले

८. केशव सत्तु भोळे

९. अनंत बापुराव भोळे

१०. आकाश सदाशिव भोसले

११. सुरेखा रामेश्वर भोळे

१२. नवनाथ संतोबा सरवदे

१३. अशोक राजाराम भोसले

१४. संजय बापुराव भोळे

१५. सुधाकर अंबाजी भोसले

तर्फे

ॲड. ए. ए. सावंत

तर्फे

ॲड. संतोष मुंडे

मानणीय दिवाणी न्यायाधीश साहेब व.स्तर गंगाखेड

RCSNO. 318/2025

वादी अंगद

वि.

प्रतीवादि तहसीलदार

वाद मनाई आज्ञा

शपथपत्र

केशव पि. सतु भोडे वय 34 वर्ष धंदा मजुरी
रा. आनंदवाडी ता. गंगाखेड

मी शपथपूर्वक निवेदन करतो की वादीचे वडील नामदेव गणपती देवकते यानी सर्वे न. 255 मधील क्षेत्रफळ 1 आर गोसावी समाजाच्या स्मशान भुमीसाठी दानपत्रा आधारे दिली आहे दानपत्र 2011 मध्ये झाल्यापासुन गोसावी समाजाच्या मयत व्यक्तीचा अंत्यसंस्कार त्या ठिकाण करण्यात येत आहे सदर जागेत शेड करायचे होते वादी अडथळा करत होता त्यामुळे 6.1.2025 रोजी तहसील मध्ये अर्ज दिला प्रकरण सुरु झाले स्थळ पाहणी झाली पंचनामा झाला चौकशी करुन तहसीलदार यानी निकाल दिला सातबारा मध्ये स्मशान भुमीची नोंद झाली आहे वादीने त्याच्या वारसास स.न. 255 आले असल्यामुळे स्मशान भुमीसाठी जागा दिली नाही असे म्हणत आमच्या विरुद्ध खोटे वादपत्र सादर केले आहे त्यामध्ये आम्ही प्रतीवादि न. 4 ते 15 यानी एकत्र केखी निवेदन सादर केले आहे त्यातील सर्व मजकुर बरोबर आहे करीता शपथपत्र दिले ते खरे आहे.

निवेदक

K. Bhd

केशव सतु भोडे

मी शपथपूर्वक निवेदन करतो की शपथपत्रातील सर्व मजकुर खरा आहे मला मान्य आहे करीता शपथेवर तसदीक केली.

निवेदक

28-8-2025

K. Bhd

केशव सतु भोडे

AFFIDAVIT

Solemnly affirmed before me
by Keshav Sattu Bhole
Age 34 yrs occu. Labour R/o Anandwadi
Tq Gangakhed

Who is identified before me
by Adv. S.D. Tarkase

to whom I Know Personally

Supdt.
C.J.S.D. Court Gangakhed 28/08/2023

Keshav

[illegible]

Exh-44

मानानीय दिवाणी न्यायाधीश साहेब व.स्तर गंगाखेड

RCSNO.
318/2025

वादि अशोक
वि.
प्रतीवादि दहसिकर

वाद मनाई आज्ञा

ORDER
Seen & filed.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2025.08.28 15:31:02 +0530
CJSD, Gangakhed.

प्रतीवादि तर्फे पुरसीस देण्यात येते की प्रतीवादि दाखल करत असलेले लेखीनिवेदन हेच वादीच्या तालुरत्या मनाई अर्जाचे उत्तर समजण्यात यावे.

28.8.2025

प्रतीवादी 4 ते 15
मधुकर भोसले व इतर

तर्फे
[signature]

Exh-45

मानणीय दिवाणी न्यायाधीश साहेब व.स्तर गंगाखेड

RCS NO.
318/2025

वादी अंगद
वि.
प्रतीवादी तहसीलदार

वाद मनाई आज्ञा

प्रतीवादी नं. 5 ने अर्जद्वारास
ॲडव्होकेट नेमले आहे आज
पाउस झाल्यामुळे प्रतीवादी
नं 5 मा. न्यायालयात
हजर नाही पुढील
तारखेस वकील पत्र
दाखल केले जाईल
करीता Appearance
Purpose दिली जाते.

प्रतीवादी नं. 5
साहेबा नवनाथ सरवदे

28.8.2025
तर्फे
[signature]

ORDER
Seen & filed.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
YADAV GAJANAN
BHANUDAS
Date: 2025.08.28
15:31:22 +0530

CJSD, Gangakhed.